सोलापूर
तरुण भारत

यशवंतराव पाटील विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

प्रभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ जुलै : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्लिक हिल फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत यशवंतराव पाटील विद्यालय, हरंगुळ(बु), लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

दि. २७ जुलै २०२५ रोजी सकाळी १०:२० ते १२:०० या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत शिक्षित मार्गदर्शन करण्यात आले.

पार्वेजी सायबर वॉरियर म्हणून सहभागी व सायबर वॉरियर पाटील सृष्टी यांनी विद्यार्थ्यांचा फोटो वॉटरमार्क तयार करणे, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात, त्या बाबत सुरक्षित व जबाबदारीने सायबर, मजबूत (स्ट्रॉन्ग) पासवर्ड कसा तयार करावा याची उदाहरणांसह माहिती दिली. तसेच सोशल मीडियाच्या वापरातील फायदे व धोके (सायबर क्राईम) याबाबत आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याविषयीही महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्त्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री अर्जुन कोटगिरे सर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री पाटील सर , पांचाळ सर ,स्वामी मॅडम व प्रमोद देवळे सर यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले.